IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# आदिवासी विकासाच्या योजना व आदिवासींचा विकास

प्रा. डॉ. सिध्दार्थ एस. मेश्राम
अर्थषास्त्र विभाग प्रमुख,
जे. एम. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भंडारा– 441904

**सारांष :**

मानव आज चंद्रावर गेला असला तरी आगगाडी व मोटारगाडी ज्यांनी अजून पाहिलेली नाही, जे जंगलदऱ्यात राहतात, कंदमुळे खातात त्यांनाच 'आदिवासी' म्हणतात. आदिवासी म्हणजे मुळ रहिवासी. आदिवासी पिढ्यानपिढ्या जंगलात वास्तव्य करतात. ते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही कोसो दूर आहेत. त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून विकासाचे भागीदार कसे करता येणार हा प्रश्न आजही अनुत्तरीत आहे. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश काळापासून जनजातींची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहेत. स्वातंत्र्यानंतर त्यांची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येऊ लागले. तरीही ते तोकडेच पडले. आदिवासींच्या सर्वांगिण विकासाचे खरे प्रयत्न पाचव्या पंचवार्षिक योजनेनंतरच वेगाने होऊ लागले. आदिवासींमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविण्याची गरज आहे. आदिवासींना जोपर्यंत औपचारिक शिक्षण अथवा व्यावसायिक शिक्षण देण्याचा प्रयत्न होत नाही. तोपर्यंत त्यांचा सामाजिक–आर्थिक विकास साध्य होणार नाही. शिक्षण ही मनुष्याच्या सर्व समस्या सोडविण्याची गुरूकिल्ली आहे. आदिवासींना आज ज्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, त्या समस्यांबद्दल त्यांच्यात जागृती निर्माण करणे महत्वाचे आहे. हया समस्या आर्थिक अथवा पर्यावरणीयही असू शकतात किंवा सावकारांकडून होत असणाऱ्या पिवळणूकीच्याही राहू शकतात. म्हणून आदिवासींच्या विकासासंबंधी कार्यक्रम आखतांना शिक्षित स्वयंसेवक व आदिवासींच्या समस्यांबद्दल पुरेपुर माहिती असणारे तज्ज्ञ अशा लोकांच्या सहकार्यांची गरज आहे.

आदिवासींच्या विकासाची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या 1976 च्या जी.आर. नुसार महाराष्ट्र सरकारने 1/4/1976 पासुन आदिवासी उपयोजना लागू केली व खात्रीची उपयोजना म्हणून 1976–77 पासुन अंदाजपत्रकाप्रमाणे प्रत्येक मुख्य शिर्षाखाली ''जनजाती क्षेत्र उपयोजना'' हे वेगळे गौणशिर्ष सुरू करण्यात आले. प्रस्तुत शोधनिबंधाचा आदिवासी उपयोजनेद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कायक्रमाअंतर्गत आदिवासींचा अपेक्षित विकास साध्य करता आला काय? त्यांच्या सामाजिक–आर्थिक व सांस्कृतिक बदलांवर काय परिणाम घडून आला? हे अभ्यासणे व यथायोग्य निष्कर्ष मांडून उपाययोजना कार्यान्वित येण्यातील अडचणी तपासून पाहणे हा प्रमुख उद्देश आहे.

**बीज संज्ञा :** आदिवासी, आदिवासी उपयोजना, केंद्रवर्ती अर्थसंकल्प, एकात्मिक जनजाती विकास प्रकल्प.

**गृहित कृत्य :**

1) आदिवासी उपयोजनेच्या अंमलबजावणीमुळे आदिवासींच्या विकासावर सकारात्मक परिणाम झालेला आहे.

2) एकात्मिक जनजाती विकास प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विकास योजना स्थानिक आदिवासींच्या विकासाला सहाय्यभूत ठरलेल्या आहेत.

3) योजनांच्या अंमलबजावणीमधील मुख्य अडचणी दूर केल्यास आदिवासींचा विकास शक्य आहे.

**संशोधन पध्दती :** प्रस्तुत अध्ययन दुय्यम सामुग्रीवर आधारित आहे. तथ्य गोळा करतांना क्रमिक प्रस्तके, संदर्भग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींच्या आधार घेतला आहे. हा निबंध केवळ उपयोजना क्षेत्रातील आदिवासींच्या अभ्यासापुरताच मर्यादित आहे.

**प्रस्तावना :** आदिवासींचा जलद विकास करण्याकरिता महाराष्ट्र सरकारने भौगोलिक क्षेत्रानिहाय तीन विभाग केले आहेत. त्यात अनुक्रमे, आदिवासी वास्तव्याचे दुर्गम विभाग, आदिवासीच्या वास्तव्याच्या ग्रामीण विभागाच्या लगतचा प्रदेश व आदिवासी वास्तव्याचा सखल प्रदेश या तीन प्रदेशांना अनुक्रमे 'ए' क्लास एरिया, 'बी' क्लास एरिया व 'सी' क्लास एरिया असे म्हटले जाते. अर्थात या नामविधाानानुसारच आदिवासींच्या विकासाची दिशा निश्चित ठरविता येते. त्यानुसार दुर्गम भागातील आदिवासी अजूनही मागास अवस्थेतच जीवन जगत आहेत. म्हणजे ज्या अवथेत अगदी प्राथमिक विकासाच्या टप्प्यातील आदिवासी जगतात. ते अतिशय दुर्गम विभागात असल्यामुळे त्यांचे जीवन खडतर आहे. ते स्थलांतरीत शेती करतात. उपजीविकेसाठी जंगलावर अवलंबून असतात. शेती कसण्याची पध्दती अतिशय पुरातन असल्यामुळे कोदो कुटकीच्या पिकासारखे पिक घेत असतात. काही उत्पादन साठवून ठेवतात. उर्वरित जीवन जंगलातील नैसर्गिक वस्तुंच्या आधारे पूर्ण करतात. ते साधारणतः डोंगराच्या पायथ्याशी असणाऱ्या उतार भागात शेती करतात. दुसऱ्या टप्प्यातील ग्रामीण भागालगतच्या क्षेत्रातील आदिवासी काही प्रमाणात अनुकरणशील असल्याने शेतीची योग्य मशागत करून सुधारित शेती करण्याचा प्रयत्न करतात. सरकारी जमिनीवर स्वतःची मालकी निर्माण करतात व काही अंशी बिगर आदिवासींप्रमाणे सुधारित शेती करण्याचा प्रयत्न करतात. सखल प्रदेशात शेती करणारे आदिवासी शेतकरी बऱ्याच प्रमाणात आधुनिक बी–बियाणे, खते व अवजारे वापरून शेतीची मशागत करतात व समाधानकारक पिके घेतात.

आदिवासींचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे शेती व्यतिरिक्त ते कोणताही अन्य व्यवसाय करतांना दिसून येत नाही. मात्र ग्रामीण लगतच्या प्रदेशातील आदिवासी उपयोजनांचे लाभ मिळविण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. त्यामुळे शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या तरूणांची संख्या हळूहळू वाढत आहे. प्रत्येक भौगोलिक परिस्थितीच्या वेगळेपणामुळे त्यांच्या समस्याही वेगवेगळया दिसून येतात. त्याकरिता सरकारी पातळीवर सर्वदूर राबविण्यात येणाऱ्या मुख्य आदिवासी उपयोजनेबरोबर स्थानिक आदिवासींच्या वेगवेगळया समस्या लक्षात घेऊन एकात्मिक जनजाती विकास प्रकल्प कार्यालय निर्माण करून एक प्रकल्प अधिकारी नियुक्त केला जातो व स्थानिक आदिवासींच्या गरजा लक्षात घेऊन तो अधिकारी नवीन योजनांची मांडणी करीत असतो. त्याकरिता त्याच्या अधिकारक्षेत्रात वेगळा विशिष्ट निधी मंजूर करण्यात येतो, त्यानुसार स्थानिक आदिवासींच्या गरजा लक्षात घेऊन नवीन उपयोजनांची मांडणी व मंजूरी घेण्यात येते. त्याला एकात्मिक जनजाती विकास प्रकल्प किंवा कार्यालय ;प्ज्क्च्द्ध असे म्हणतात.

**आदिवासी उपयोजना तयार करण्याची पध्दती :**

आदिवासी उपयोजना कार्यान्वित करतांना स्थानिक आदिवासींच्या दृष्टीने काही त्रूटी आणि वैगुण्ये निर्माण झाली होती. या त्रूटी व वैगुण्ये लक्षात घेऊन राज्य सरकारने सदर बाब आठव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी राज्य नियोजनापुढे मांडली. या बाबींचा अभ्यास करण्यासाठी श्री. द. म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी 1991 मध्ये राज्य नियोजन मंडळाने एका उपसमितीची नियुक्ती केली. या उपसमितीने जून 1992 मध्ये सादर केलेल्या अहवालातील शिफारसी राज्य शासनाने स्वीकारल्या. या शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत.

1) आदिवासी उपयोजनेसाठी जो वार्षिक निधी उपलब्ध करून द्यावयाचा आहे, त्या निधीची रक्कम नियोजन विभागाने प्रथम आदिवासी विकास विभागाला कळवावी व त्या निधीच्या मर्यादेत आदिवासी उपयोजना जिल्हयानुसार अंतिम स्वरूप देण्याची जबाबदारी नियोजन विभागाकडे न राहता ती आदिवासी विकास विभागाकडे सोपवावी.

2) आदिवासी उपयोजनेचे आकारमान एकूण 9 टक्केपर्यंत म्हणजे आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात असावे.

3) आदिवासी योजनांमध्ये अधिक महत्वाच्या योजनांना म्हणजेच पिक संवर्धन, सामाजिक वनिकरण, प्राथमिक शिक्षण, आरोग्य सेवा, विद्युत विकास, पशुसंवर्धन, रस्ते, लघुपाटबंधारे इत्यादी योजनांना प्राधान्य द्यावे.

या शिफारशी लक्षात घेऊन प्रकल्पाचा आराखडा तयार करून जिल्हा नियोजन व विकास मंडळाची मान्यता घेतल्यानंतर राज्यमंत्री व आदिवासी विभागाचे सचिव यांनी जिल्हयाचे खासदार, आमदार, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक विकास प्रकल्प), नियोजन अधिकारी आयुक्त, अप्पर आयुक्त, मंत्रालयीन प्रशासकीय अधिकारी इत्यादींबरोबर जिल्हावार बैठका घेऊन त्याला अंतिम स्वरूप देण्याची पध्दत सुरू केली.

**आदिवासी उपयोजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना :**

महाराष्ट्रात आदिवासी उपयोजने अंतर्गत वेगवेगळया शिर्षानुसार विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. हया योजना महाराष्ट्रातील एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून त्या–त्या जिल्हयात आदिवासी उपयोजनेत येणाऱ्या क्षेत्रातील आदिवासींपर्यंत पोहचविण्यात येतात. हया उपयोजना संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात येतात. त्याचे पुढील 7 गटात विभाजन करण्यात येते.

गट क्र. 1 – कृषी व संलग्न सेवा

गट क्र. 2 – ग्रामीण विकासासाठी विशेष कार्यक्रम

गट क्र. 3 – पाटबंधारे व पुरनियंत्रण

गट क्र. 4 – विद्युत विकास

गट क्र. 5 – उद्योग व खाणकाम

गट क्र. 6 – वाहतूक व दळणवळण

गट क्र. 7 – सामाजिक व सामुहिक सेवा

वरील 7 गटापैकी गट क्रमांक 1 मधील मुख्य शिर्षक कृषी व संलग्न सेवांचा असून या शिर्षाअंतर्गत 8 उपशिर्षांचा समावेश आहे. त्यातील पिकसंवर्धन, फलोत्पादन, मृद व जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, मत्स्य व्यवसाय विकास या 6 योजना कृषी व तत्सम व्यवसायाशी संबंधित असतात तर वने व सहकार या योजना हया कृषीशी संबंधित नसुनही त्यांचा समावेश कृषी संलग्न सेवा या गटात समाविष्ट करण्यात आला आहे. या दोन योजना आदिवासींच्या रोजगाराशी संबंधित आहेत. त्यामुळे आदिवासींच्या आर्थिक विकासात कृषी व तत्सम व्यवसायावर अवलंबून असलेल्या योजना अतिशय महत्वाच्या आहेत.

कृषी व संलग्न सेवा या पहिल्या गटातील मृद व जलसंधारण ही एक कृषी उत्पादनात वाढ घडवून आणणारी महत्वाची योजना आहे. भारतीय शेती ही पावसावरील जुगार आहे असे म्हटल्या जाते. ज्यावर्षी पाऊस पडला त्यावर्षी शेतीतील पिकांचे उत्पादन वाढते आणि पावसाने दगा दिला त्यावर्षी दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते. ही गोष्ट आदिवासी शेतकऱ्यांनाही लागू होते. म्हणून पावसाळयातील नैसर्गिक पावसाचे योग्य नियोजन करता यावे म्हणून तलाव, बोडी, नाले, छोटे–छोटे बांध बांधुन त्यामध्ये पाणी साठवून ठेवणे आवश्यक असते. म्हणून मृद व जलसंधारणाचा मुलभूत कार्यक्रम हाती घेऊन बांध बंधिस्ती व मजगीकरण केले जाते. राज्यात लागवडीखालील एकूण शेतीपैकी केवळ 30 टक्के क्षेत्रामध्येच पाटबंधाऱ्याच्या पाण्याची सोय केली जाऊ शकते, त्याशिवाय पाटबंधाऱ्याखालील एकूण क्षेत्रापैकी केवळ 40 ते 50 टक्के क्षेत्र हे भूपृष्ठावरील पाटबंधाऱ्याच्या पाण्याखाली येते म्हणून कृषी व संलग्न सेवेत मृद व जलसंधारण योजनेला अनन्यसाधारण महत्व आहे. ही कृषीला पूरक अशी योजना आहे. त्यामुळे या कार्यक्रमावर आदिवासी उपयोजनेमध्ये बराच मोठा खर्च केला जातो.

पिक संवर्धन, फलोत्पादन, मृद व जलसंधारण, पशूसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्य व्यवसाय, वने व सहकार या सर्व उपशिर्षावरील कार्यक्रमांमुळे व त्यावर योग्य खर्चाची विभागणी केल्यामुळे सर्व योजनांचे आदिवासीच्या कृषी विकास योजनेत महत्वाचे स्थान आहे. तरीही कृषीला निगडित असलेले सर्व कार्यक्रम व उपशिर्ष आदिवासी विकासाला व त्यांच्या कृषी व तत्सम व्यवसायाला अधिक सफल करण्यासाठी उपयुक्तच आहे. परंतु आदिवासी उपयोजनेच्या सातही प्रमुख घटकांचे तेवढेच योगदान आहे. कृषी व संलग्न सेवा सर्वाधिक महत्वाचे मानले गेले पाहिजे. कारण आदिवासींचा प्रमुख व्यवसाय शेती आहे व शेतीवर अवलंबून असलेले तत्सम व्यवसाय, जसे दुग्धविकास, मत्स्यविकास, शेतीच्या विकासासाठी मृद व जलसंधारण हया योजना तेवढयाच महत्वाच्या आहेत. आदिवासी क्षेत्रात या योजना कार्यान्वित करणाऱ्या यंत्रणेच्या तत्परतेवरही त्या विशेष महत्वाच्या ठरू शकतात. आदिवासी विकास म्हणजे भारतीय समाज व्यवस्थेतील मागास राहिलेला एक आपल्याच बांधवाचा समूह, वर्ग अशी भावना मनात निर्माण करून हया सर्व योजना कार्यान्वित करण्यात येऊ लागल्यास व मानवता आणि आदिवासींच्या विकासाप्रती तत्परता दाखविल्यास हजारो वर्षापासून विकासाच्या कोसो दूर असणाऱ्या आदिवासी बांधवांच्या विकासाचा गाडा पुढे रेटणे अवघड कार्य नाही. परंतु हे अधिकाऱ्याच्या आपुलकी, कौशल्य व तत्परतेवरच अवलंबून आहे.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना व आदिवासी विकास :**

महाराष्ट्रात निरनिराळया ठिकाणी राहणाऱ्या विविध आदिवासी जमातीच्या विकासाच्या प्रगतीमध्ये कमी अधिक तफावत आहे. प्रत्येक क्षेत्रातील आदिवासीच्या विकास कार्यक्रमांमध्येही अंतर आहे. म्हणून वेगवेगळया काळातील व स्थळातील आदिवासींच्या समस्या लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना तयार करणे महत्वाचे असते असे शासनाच्या निदर्शनास आले. म्हणून न्युक्लिअस बजेट या संज्ञेअंतर्गत स्थानिक आदिवासींसाठी योजना तयार करण्याचे अधिकार त्या क्षेत्रातील एकात्मिक जनजाती विकास प्रकल्प अधिकाऱ्याला देण्यात आले आहेत. ही योजना महाराष्ट्रात 1981–82 पासुन सुरू करण्यात आली आहे. हया योजना प्रकल्प अधिकारी यांच्या परिसरातील आदिवासींच्या गरजा व उपलब्ध साधनसामुग्री लक्षात घेऊन तयार केल्या जातात. जसे– तेंदुपत्ता गोळा करणे, बांबूपासून कलाकुसरीच्या वस्तु तयार करणे, कांडपयंत्र पुरविणे, पत्रावळी तयार करणे, ज्या योजनेचा सामवेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरूपाच्या व स्थानिक महत्वाच्या कर्जविरहीत योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा या अंदाजपत्रकाचा मुख्य हेतू असतो.

या योजने अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील प्रकल्प अधिकाऱ्यास तशा प्रकारच्या योजना तयार करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे आणि विहित कार्यपध्दती अवलंबुन त्या–त्या विभागाकडून राबवून घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

**योजनेचे स्वरूप :**

1) प्रत्येक आदिवासी व्यक्तीस/कुटुंबास या कार्यक्रमांतर्गत आर्थिक मर्यादा रू. 15000/– पर्यंत अनुदान देणे.

2) यासाठी काही गट नमूद केले असून अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना, ब) प्रशिक्षणाच्या योजना, क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना, ड) आदिवासी कल्याणाच्या योजना अशा चार गटात विकासाच्या योजना आखण्यात आल्या आहेत.

3) अ गटात अनुदानाची मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

अ) सर्वसाधारण अदिवासी ज्यांना 85 टक्के व 15 टक्के वैयक्तिक सहभाग ब) आदिम जमाती लाभार्थी 95 टक्के व 5 टक्के वैयक्तिक सहभाग, क) जेथे अर्थसहाय्य रूपये 2000 असेल तेथे 100 टक्के अर्थसहाय्य देण्याचे प्रयोजन आहे.

4) शासन निर्णय दि. 31 मे 2001 च्या मार्गदर्शक अटी व शर्तीनुसार पात्र लाभार्थी ठरवून त्यांनी केलेल्या मागणीनुसार योजना तयार करून अपर आयुक्ताकडे ते निर्देश समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांच्याकडून मंजुरी घेणे आवश्यक असते.

5) अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या एखाद्या योजनेवर अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पूरक खर्च न्युक्लिअस बजेट मधून करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव मंजुरीसाठी आयुक्त, आदिवासी विभाग यांच्याकडे सादर करावा लागतो.

6) शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार जे कार्यक्रम न्युक्लिअस बजेट अंतर्गत देता येत नाहीत परंतु स्थानिक परिस्थितीनुसार खास कार्यक्रम घेणे आवश्यक आहे, असे समितीस वाटल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे असे या योजनेचे स्वरूप असते.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती :**

आदिवासींच्या विकासासाठी एखादी योजना आवश्यक वाटल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करून संचालन समितीकडे प्रकल्प अधिकारी यांना सादर करावयाचा असतो. या समितीमध्ये खालील सभासद असतात.

1) अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्त, नाशिक अथवा नागपूर – अध्यक्ष

2) योजनेच्या अंमलबजावणीचे प्रादेशिक किंवा जिल्हा परिषद विभागप्रमुख – सभासद

3) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प – सभासद सचिव

4) आदिवासी कार्यकर्ता – अशासकीय सदस्य.

वरील समितीने योजना मंजूर केल्यानंतर संबंधित लाभधारकांना आवश्यक ती मदत दिली जाते.

**लाभधारकांना अनुदान देण्याची पध्दत :**

केंद्रवर्ती अर्थसंकल्पा अंतर्गत प्रामुख्याने वैयक्तिक व कौटुंबिक योजना राबविल्या जातात. या योजनांवर 100 टक्के, 50 टक्के, 80 टक्के या प्रमाणात अनुदान दिले जाते. हे अनुदान रोख रकमेच्या रूपाने दिले जात नाही. तर बँकेकडून कर्ज घेऊन शिवणयंत्र, गाई–म्हशी इत्यादींसाठी पंचायत समितीतर्फे व संबंधित अधिकाऱ्याकडून कर्ज प्रकरणे तयार करून कर्ज मंजूर करण्यात येतात. प्रकल्प कार्यालयामार्फत त्या योजना राबवल्या जातात. आणि वस्तूंच्या रूपात लाभार्थीना लाभ देण्यात येतो.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे गट :**

या योजनेनुसार लाभार्थीना मोठया प्रमाणात अनुदाने देण्याची मुभा असली तरी, या योजनेचा खरा उद्देश लक्षात घेऊन 4 गटात विभागणी करण्यात येते.

अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना

ब) प्रशिक्षणाच्या योजना

क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना

ड) आदिवासी कल्याणात्मक योजना

**अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना :**

या योजनांमध्ये शेती उत्पन्न वाढविणे, लहान लहान सिंचनाच्या योजना, इनवेल बोअर, सिंचनासाठी कूपनलिका, भाताच्या शेतात बोळया बांधणे, सिंचनासाठी पी.व्ही.सी. किंवा तत्सम पाईप पुरवणे, डिझल पंप पुरवणे, पंपसंच निकामी असल्यास दुरूस्तीची सोय करणे, इत्यादी योजनांचा समावेश आहे. तसेच दुग्धव्यवसाय संवर्धन, पशूविकास, फळबाग विकास,

मत्स्यव्यवसाय विकास, कुटीर उद्योग व हस्तकाल व्यवसाय, रेशमी तथा कोळसा उत्पादन उद्योग, मधुमक्षिका पालन इत्यादी विकासाकरिता वैयक्तिक लाभाच्या किंवा कुटुंबाच्या लाभाच्या योजनांचा समावेश होतो.

वरील योजनांचे आदिवासी लाभार्थींना ज्ञान व कौशल्य प्राप्त करण्याकरिता अर्थसंकल्पात प्रशिक्षणाचाही समावेश करण्यात येतो. ज्या योजना उत्पन्न निर्मितीच्या असतात त्यात लाभार्थींचा काही आर्थिक सहभाग असणे आवश्यक आहे. या गटातील योजनांमध्ये पुढील योजनांचा समावेश होतो. 1) अनुदानावर संकरित गायी, शेळी गट, म्हशी पुरविणे, 2) अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप पुरविणे, 3) अनुदानावर लाऊड स्पीकर व मंडप पुरविणे, 4) किराणा दुकान व पानटपरीसाठी अनुदान पुरविणे, 5) आदिवासींना फोटोग्राफी व्यवसायाकरिता अनुदान पुरविणे, 6) दारिद्रय रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना जैविक खते व किटनाशके असे संयुक्त पॅकेज देणे, 7) आदिवासी तरूणांना स्वयंरोजगाराकरिता हॉटेल चालविणे, सुतारकाम, हस्तकला/सायकल दुरूस्ती, गवंडीकामास कर्जपुरवठा करणे, 8) रास्त–भाव दुकानदारांना भांडवल पुरवठा करणे. अशा विविध बाबींसाठी/व्यवसायांसाठी अनुदान पुरविणे इत्यादींचा समावेश आहे.

**ब) प्रशिक्षणाच्या योजना :**

आदिवासी व्यक्तिंना रोजगार किंवा नोकरी मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होतील अशा प्रशिक्षणाच्या योजनांचा या गटात समावेश आहे. त्यात विविध स्पर्धात्मक परिक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण व उद्बोधन वर्ग आयोजित करणे, कॉम्प्युटर प्रशिक्षण, टंकलेखन/लघुलेखन, शिवणकामाचे प्रशिक्षण, सुतार, वायरमन, रेडिओ/टी.व्ही. मेकॅनिक व वाहनचालक प्रशिक्षण, सशस्त्र दल, राज्य राखीव दल किंवा केंद्र/ राज्य शासनाच्या निमलष्करी दलात भरतीपूर्व प्रशिक्षण व अन्य नोकऱ्यासाठी उपयुक्त प्रशिक्षण इत्यादी योजनांचा समावेश होतो.

**क) मानवी साधनसपंत्तीच्या विकासाच्या योजना :**

या योजनेमध्ये सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण योजना, क्रिडा, कला, साहित्य व संस्कृती हयांची जोपासना व संवर्धन हयांचा समावेश होतो. आदिवासींच्या गुणवत्ता व व्यक्तिमत्व विकासाच्या योजना, त्यांना सुविद्य, सुदृढ व समृध्द नागरिक बनविणे या सर्व उपक्रमांचा अंतिम उद्देश आहे.

या गटाअंतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. 1) आदिवासी मुलामुलींना सायकल वाटप, 2) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना चष्मे देण्यासाठी अनुदान, 3) कृषी प्रदर्शन आयोजित करणे, 4) कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत ब्लॅंकेट वाटप करणे, 5) अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रमासाठी अनुदान या सर्व योजनांचा समावेश होतो.

**ड) आदिवासी कल्याणात्म योजना :**

या गटात आदिवासींच्या त्या–त्या भागातील गरजांवरील समस्यांवर आधारित अशा वैयक्तिक व सामूहिक कल्याणाच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरणाऱ्या काही योजना या गटांतर्गत राबविण्यात येतात. अशा योजनांमध्ये घराचे विद्युतीकरण, बाल व महिला कल्याणासाठी अभिनव उपक्रम, आदिवासींवरील आपातकालिन किंवा अत्याचार प्रकरणी, अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीचे सहाय्य देणे इत्यादी याचा समावेश होतो.

या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी) यांच्याकडे अर्जाचे नमुने उपलब्ध असतात. प्रकल्प अधिकारी स्वतः प्रयत्न करून गरजू आदिवासींना महामंडळाकडून किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेकडून कर्ज मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. या गटात पुढील योजनांचा समावेश होतो. 1) आपदग्रस्त आदिवासींना अर्थसहाय्य, 2) घर जळाल्यास अर्थसहाय्य, 3) मेळावे आयोजित करणे, 4) आदिवासी नृत्य पथकातील आदिवासी कलाकारांना नृत्याचा पोशाख साहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य, 5) आश्रमशाळेतील अपंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव पुरविणे, या सर्व योजनांचा समावेश होतो.

**निष्कर्ष :**

वरील विवेचनावरून आदिवासी उपयोजनेसंबंधीच्या अंमलबजावणी संदर्भात काही प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सबलीकरणासाठी शासन पातळीवर राबविण्यात येणाऱ्या उपयोजना फार विस्तृत व आदिवासींच्या सर्वांगिण विकासाला पोषक ठरू शकतील अशाच आहेत. परंतु त्यांच्या अंमलबजावणीतील उणिवा दूर करण्याची नितांत गरज आहे.

2) आदिवासी उपयोजनेमध्ये निर्मीत 7 मुख्य गटांपैकी कृषी व संलग्न सेवा या गटातील उपनिर्षांतगत राबविण्यात येणाऱ्या इतर 8 प्रकारच्या योजना सातत्याने, दक्षतेने व आदिवासींच्या सामाजिक हिताच्या भावनेतून राबविण्यात आल्यास आदिवासींच्या आर्थिक विकासाला प्रेरणा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

3) आदिवासींच्या योजना विस्तृत आहेत. तरीही आदिवासींचा कृषी विषयक, शैक्षणिक व सामाजिक विकास कासवगतीने का होत आहे? आजही दुर्गम भागातील आदिवासी आदिम मानवाच्या अवस्थेतच जगत आहेत, असे का होते? या प्रश्नांची उत्तरे सापडत नाही.

4) कातकरी, कोलाम आणि माडिया गोंड हया जमाती च्तपउपजपअम म्हणून ओळखल्या जातात. त्या आजही 'जैसे थे' या अवस्थेत असल्याने त्यांच्या विकासाचे वेगळे प्रारूप तयार करण्याची गरज नाकारता येत नाही.

5) वेगवेगळया ठिकाणी उभारण्यात आलेले प्रकल्प अधिकाऱ्यांचे कार्यालय आदिवासींच्या स्थानिक गरजांचा विचार करून योजना तयार करीत असतात व मंजूर करून विशिष्ट संबंधित क्षेत्रात कार्यान्वित करीत असतात हे कार्यक्रम अंत्यत व्यापक, महत्वाचे व त्या–त्या क्षेत्रातील आदिवासींचे सर्वांगिण विकास करण्यास पुरेसे आहेत. तरीही त्यांचे विकासाचे प्रमेय कुठेतरी कमी पडते आहे. असेच दिसून येते. त्यावर योग्य उपाय योजना करण्याची, कार्यक्रमात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

6) केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजना राबवितांना दुरदुरच्या आदिवासी जमातीपर्यंत सर्व योजना व कार्यक्रमांचा प्रसार करणे महत्वाचे असते. परंतु दुरच्या आदिवासींपर्यंत माहितीचा प्रसारच होत नाही. ते उपयोजनांपासून वंचित राहतात. म्हणून उपयोजना कार्यक्रमांचे प्रचार व प्रसार करणे जिकरिचे काम आहे. यावर मात करून खेळोपाळी जाऊन आदिवासींमध्ये जागृती निर्माण करणे महत्वाचे आहे. यासंबंधी प्रशासन स्तरावर विचार झाला पाहिजे.

7) आदिवासींना शिक्षणाचे महत्व अजुनही कळलेले नाही. त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण करणे गरजेचे आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास आदिवासींना उपयोजनेचा लाभ घेता येणे शक्य होईल. बऱ्याचदा त्यांची दिशाभूल करण्याचाही प्रयत्न होतो. समाजसुधारक म्हणून पुढे आलेले शिक्षित आदिवासी युवक त्यांना योजना मिळवून देण्याचे आमिष दाखवून पैसे लूबाडण्याचे काम करतांना आढळून आले आहेत. म्हणून प्रशिक्षणाच्या योजना राबवून आदिवासींना त्या प्रशिक्षणात येनकेन प्रकारे सामील करून घेण्याचे आटोकाट प्रयत्न झाले पाहिजे. यासाठी शासकीय यंत्रणा सज्ज व दक्ष असली पाहिजे.

8) काही आदिवासी मिळालेल्या योजनांचा दुरूपयोग करण्याचा प्रयत्न करतांना आढळून आले आहेत. अशा आदिवासींना योग्य समजूत घालून योजनांच्या लाभाचे महत्व कथन करून पुन्हा गैरमार्गाचा अवलंब करणार नाही, अशाप्रकारचे विशेष प्रयत्न करायला पाहिजे. त्याकरिता आदिवासींना मिळालेल्या योजना ते सफलतापूर्वक उपयोगात आणतात किंवा नाही याचा पाठपुरावा करण्याची गरज आहे.

अशा रितीने प्रशासकीय अधिकारी आदिवासी उपयोजना राबवितांना दक्ष असतील व आदिवासींचे कैवारी या भावनेने योजनांची अंमलबजावणी करीत असतील तर या योजनांचा लाभ गरजू आदिवासींना मिळाल्याशिवाय राहणार नाही.

**समारोप :**

स्वातंत्र्याच्या पूर्वी इंग्रजांच्या कालकिर्दीत काही प्रशासकीय पदावर असणाऱ्या अधिकाऱ्यांनी आदिवासी विकासाचे काम हातात घेतल्याचे दिसून येते. परंतु त्यात विशेष तळमळ दिसून येत नव्हती. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आदिवासींच्या विकासाकडे लक्ष पुरविण्याची गरज तत्कालीन सरकारी स्तरावर निर्माण झाल्याचे दिसून येते. तरीही आदिवासी उपयोजनेची मांडणी केल्यानंतरच (1975–76 नंतरच) खऱ्या अर्थाने आदिवासी विकासाची खरी निकड प्रशासकीय पातळीवर निर्माण झाल्याचे दिसते. हा कालावधी बराच मोठा आहे. आदिवासीची सामाजिक–आर्थिक स्थितीचा विचार करताना दिसून येते की, त्यांच्या विकासाची निकड सरकारी पातळीवर फारच उशिरा निर्माण झाली. 1976 ला आदिवासी उपयोजनेची मांडणी करून विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याचाा प्रयत्न झालेला असला तरी त्यात 1981–82 म्हणजेच न्युक्लिअस बजेच्या कालावधीपर्यंत उपयोजनांचे मुल्यांकन झाले नाही. हे मुल्यांकन करतानाही बराच कालावधी व्यर्थ गेला. आज 44–45 वर्षाचा काळ लोटूनही आदिवासींच्या विकासाची तीव्रता तेवढीच आहे. हयाचा अर्थ आदिवासींच्या विकासाचे स्वातंत्र्याच्या 70 वर्षानंतरही समाधानकारक विकास न झाल्याचे दिसून येते. ही फार खेदाची बाब आहे. विविध क्षेत्रातील आदिवासींच्या गरजांची विविधताही लक्षात घेऊन तयार करण्यात आलेले एकात्मिक जनजाती विकास प्रकल्पाचेही मुल्यांकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. हयाचा अर्थ असा की प्रकल्प कार्यालयातून कार्यान्वित होणाऱ्या योजनांद्वारेसुध्दा आदिवासींना मिळणारा लाभ अल्प असाच आहे. कातकरी, कोलाम आणि माडिया यांचे जीवन तर खडतरच आहे. योजनांच्या लाभात ते अजुनही अनभिज्ञ आहेत. त्यांचे संपूर्ण आयुष्य वने व जंगले यातील वस्तुंवर, त्यांच्या उपभोगावर व वनौपजे गोळा करून त्या विक्रीवरच अवलंबून आहे. भारताच्या जागतिक महासत्ता होऊ पाहणाऱ्या स्वप्नातील एक मोठा समाजघटक मुख्य प्रवाहाच्या बाहेरच आहे. अशा स्थितीत भारताने महासत्ता होण्याचे स्वप्न तेव्हाच रंगविण्यात यश आहे की, जेव्हा भारतातील अनुसूचित जाती व जमाती यांचे दारिद्रय, मागासलेपणा, उत्पन्नातील प्रचंड विषमता, सामाजिक–आर्थिक असमानता या सर्व बाबीवर मात केली जाईल. अन्यथा सर्व उपयोजना, विकासाचे कार्यक्रम व कागदोपत्री दिसून येणारे पैशाचे आकडे व्यर्थ व दुरूपयोगी झाले ही शंका निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भसूची :**


1. ''अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणाच्या योजना आणि 1979–80 च्या अर्थसंकल्पात त्यासाठी केलेल्या तरतूदी'', महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई, मार्च–1979.
2. गारे गोविंद : 'महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती व विकास', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, 28, क्वीन गार्डन, पुणे–411001.
3. गारे गोविंद : 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे–30.
4. गारे गोविंद : 'महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित (आदिवासी) जमाती', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, 2002, विजयानगर, पुणे–411030.
5. गुप्ता मंजू : 'जनजातीयों का सामाजिक आर्थिक उत्थान', अर्जुन पब्लिशिंग हाऊस, अंसारी रोड, दरियागंज, नई दिल्ली–110002.
6. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, भंडारा जिल्हा, 2005–2006.
7- Jain Navinchandra, Robin Tribhuwan : 'An overview of Tribal Research Studies', Tribal Research and Training Institute, 28, Qureens Garden, Pune-411001.
8. लोटे रा. ज. : 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, जुलै–2010, महाल, नागपूर–440032.
9. लोकराज्य : (आदिवासी विकास विशेषांक), 16 डिसेंबर 1983, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.

10. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, ऑक्टोबर–डिसेंबर 2011/खंड 35, अंक 3, मातृ–पितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, शहादा–425409 जिल्हा – नंदुरबार.

11. निकम अविनाश : 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, ऑक्टोबर–डिसेंबर 2014/खंड 38, अंक 3, मातृ–पितृ कृपा, प्लॉट नं. 30, परिमल कॉलनी, शहादा–425409 जिल्हा – नंदुरबार.

12. पाटील जगन्नाथ : 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, एप्रिल–जून 2009/खंड 33, अंक 1, शांती प्लाझा, बी–9, शनिवार पेठ, सातारा–415002.

13. पाटील जगन्नाथ : 'अर्थसंवाद', मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक, जानेवारी–मार्च 2009/खंड 32, अंक 4, शांती प्लाझा, बी–9, शनिवार पेठ, सातारा–415002.

14- Russell R. V., I.C.S. Central Provinces District Gazetteers, Bhandara District, Volume A.

15- Rao Ramna V., I.C.S. Tribal Development', New Approaches, Discovery Publishing House, New Delhi-110002.

16- The National Tribal Policy, Ministry of Tribal Affairs http:/tribalgovt.in Dated 10th April 2008.

17. 'वार्षिक आदिवासी उपयोजना', 2003–04, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन.